# वसई विरार शहर महानगरपालिका

**मा. स्थायी समिती सभा दिनांक १० /०३/२०१७**

**सकाळी ११.३० वा.**

| अ. क्र. | विषयाचे नाव | मा. स्थायी समिती सभेचा निर्णय |
|---|---|---|
| १ | मागील मा. स्थायी समिती सभा दिनांक २७/०२/२०१७ रोजीचे कायम केलेले इतिवृत्त माहितीस्तव. | **ठराव :-** मागील मा. स्थायी समिती सभा दि. २७/०२/२०१७ रोजीचे इतिवृत्त दुरुस्तीसह मंजूर करणेंत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. राजेंद्र कांबळी सूचक :- मा.श्री. समीर डबरे**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| २ | महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती डी मधील वॉर्ड नं. ९२ नवघर पूर्व येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचे नुतनीकरण करणेचे कामाचे अंदाजपत्रकीय रक्कमेस प्रशासकीय व वित्तीय मंजुरी मिळणेबाबत. | **ठराव** :- वरीलप्रमाणे प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा होऊन उपरोक्त नमुद कामी होणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देण्यांत येत आहे. तसेच पुढील निविदा कार्यवाहीस मान्यता देण्यांत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. पंकज पाटील सूचक :- मा.श्री. चंद्रकांत गोरीवले**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ३ | महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती एच मधील वॉर्ड नं.९६ मधील दिवाणमान तलावाचे खोदकाम, रंगकाम व गाळ काढणेचे कामाचे अंदाजपत्रकीय रक्कमेस प्रशासकीय व वित्तीय मंजुरी मिळणेबाबत. | **ठराव** :- वरीलप्रमाणे प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा होऊन उपरोक्त नमुद कामी होणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देण्यांत येत आहे. तसेच पुढील निविदा कार्यवाहीस मान्यता देण्यांत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. किशोर पाटील सूचक :- मा.श्री. चंद्रकांत गोरीवले**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ४ | प्रभाग समिती (ई) नालासोपारा अंतर्गत गास विभागातील मोठा तलाव सन २०१७ ते २०२० (तीन वर्षासाठी) करिता मत्स्यसंवर्धनासाठी देणेकामी ई | **ठराव :-** सदर विषयाबाबत सभेमध्ये सविस्तर चर्चा केली असता प्रस्तावित केल्याप्रमाणे गास येथील मोठा तलाव मत्स्यसंवर्धनासाठी ठेका पद्धतीने देणेकामी सन २०१४-१७ या तीन वित्तीय वर्षातील मंजुर रक्कमेवर १०% वाढ करुन रु. १७,९१,४०५/- इतकी रक्कम निश्चित करणेंत येत आहे. निश्चित केलेल्या रक्कमेवर प्रती वर्षी (सन २०१७ ते २०२०) या कालावधीसाठी १०% वाढ करुन मंजूर निविदाधारकांकडून रक्कम स्विकारणेंस तसेच |

| | | |
|---|---|---|
| | निविदा मागविणेबाबत. | नियमानुसार १५% दराने सेवा कर आकारुन ई-निविदा मागविणेस व वर्तमानपत्रात ई-जाहिर निविदा सुचना प्रसिध्द करणेस ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. किशोर पाटील   सूचक :- मा.श्री. चंद्रकांत गोरीवले**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ५ | वसई-विरार शहर महानगरपालिका, प्रभाग समिती (ई) नालासोपारा कार्यक्षेत्रातील गाव मौजे निर्मळ विभागातील मालई तलाव सन २०१७ ते २०२० या तीन वर्षाकरिता मत्स्यसंवर्धनासाठी देणेकामी ई निविदा मागविणेबाबत. | **ठराव :-** सदर विषयाबाबत सभेमध्ये सविस्तर चर्चा केली असता प्रस्तावित केल्याप्रमाणे निर्मळ येथील मालई तलाव मत्स्यसंवर्धनासाठी ठेका पध्दतीने देणेकामी  सन २०१४-१७ या तीन वित्तीय वर्षातील मंजुर रक्कमेवर १०% वाढ करुन रु. १०,०१,५५०/- इतकी रक्कम निश्चित करणेंत येत आहे. निश्चित केलेल्या रक्कमेवर प्रती वर्षी (सन २०१७ ते २०२०) या कालावधीसाठी १०% वाढ करुन मंजूर निविदाधारकांकडून रक्कम स्विकारणेंस तसेच नियमानुसार १५% दराने सेवा कर आकारुन ई-निविदा मागविणेस व वर्तमानपत्रात ई-जाहिर निविदा सुचना प्रसिध्द करणेस ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. समीर डबरे   सूचक :- मा.श्री. राजेंद्र कांबळी**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ६ | भारत सरकार यांचेकडील दर करार मधून १ नग रिको कंपनीचे झेरॉक्स मशिन खरेदी करणेस मान्यता देणे. | **ठराव :-** सभागृहात साधक-बाधक चर्चा करण्यांत आली. झेरॉक्स मशिनद्वारे किती झेरॉक्स काढल्या जातात, मशिनची क्षमता किती, मशिन कोणत्या वर्षी मागविलेल्या आहेत, त्यांचे आयुष्य संपले किंवा कसे ? असलेल्या मशिन कार्यरत बाबत अहवाल, नविन मशिनची आवश्यकता इ. बाबींबाबत परिपुर्ण अहवालासह प्रशासकीय मंजूरीसाठी विषय ठेवेणेंत यावा. तोपर्यंत सदरचा विषय तहकुब ठेवणेंस ही सभा मंजूरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. समीर डबरे   सूचक :- मा.श्री. राजेंद्र कांबळी**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ७ | नगरसचिव विभागाकरीता नविन झेरॉक्स मशिन खरेदी करणेबाबत. | **ठराव :-** सभागृहात साधक-बाधक चर्चा करण्यांत आली. झेरॉक्स मशिनद्वारे किती झेरॉक्स काढल्या जातात, मशिनची क्षमता किती, मशिन कोणत्या वर्षी मागविलेल्या आहेत, त्यांचे आयुष्य संपले किंवा कसे ? असलेल्या मशिन कार्यरत बाबत अहवाल, नविन मशिनची आवश्यकता इ. बाबींबाबत परिपुर्ण अहवालासह प्रशासकीय मंजूरीसाठी विषय ठेवेणेंत यावा. तोपर्यंत सदरचा विषय तहकुब ठेवणेंस ही सभा मंजूरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. किशोर पाटील   सूचक :- मा.श्री. राजेंद्र कांबळी**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |

| | | |
|---|---|---|
| ८ | वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती एफ धानिव/पेल्हार कार्यक्षेत्रातील सन २०१७-१८ या वित्तीय वर्षाकरीता १) बिलालपडा, धानिव, पेल्हार, गावराईपाडा व शिरसाड दैनंदिन बाजार २) मांडवी आठवडे बाजार वार्षिक ठेका पध्दतीने बाजार कर वसूल करणेकामी . | **ठराव :-** सन २०१७-१८ या वित्तीय वर्षात वसई-विरार शहर महानगरपालिका, प्रभाग समिती (एफ) धानिव/पेल्हार कार्यक्षेत्रातील १) बिलालपडा, धानिव, पेल्हार, गावराईपाडा व शिरसाड दैनंदिन बाजार २) मांडवी हद्दीतील आठवडे बाजार वार्षिक ठेका पध्दतीने देणेकामी ई-निविदा मागविणे तसेच वर्तमानपत्रात जाहीराती देणे याकामी येणाऱ्या खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मंजूरी सर्वानुमते देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.सुदेश चौधरी सूचक :- मा.श्री. प्रशांत राऊत**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ९ | वसई विरार शहर महानगरपालिका सी.सी.टी.व्ही. निविदे अंतर्गत पालिकेच्या विविध विभागात नविन सी.सी.टी.व्ही. बसवून देखभाल दुरुस्ती करणेबाबत. | **ठराव :-** सदर बाबत सभागृहात सविस्तर चर्चा करणेंत आली. सदर प्रस्तावित कामी वसई-विरार शहर महानगरपालिकेतील मुख्यालय, प्रभाग समिती, अग्नीशमन केंद्र, इस्पितळे, वाचनालये व आपतकालीन विभाग या विभागात लावण्यात येणाऱ्या सी.सी. टि.व्ही कॅमेरांचे प्रमाणे निश्चित नसल्याने हा प्रस्ताव अपुर्ण असल्याने तहकुब ठेवण्यांत येत असून सर्व्हेक्षण करुन कामाची निश्चित आवश्यकता व प्रमाण ठरवून सर्व्हेक्षणाच्या अहवालासहित सदरचा प्रस्ताव फेर सादर करणेंत यावा.<br>**अनुमोदक :- मा.श्री. किशोर पाटील सूचक :- मा.श्री.पंकज ठाकूर**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| १० | प्रभाग समिती (ड)(जुना) कार्यक्षेत्रातील वॉर्ड नं. ६१ जुना वालिव ग्राउंड विकसीत करणे कामी ई निविदा रद्द करणेबाबत. | **ठराव :-** वरीलप्रमाणे प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा होऊन उपरोक्त नमुद काम रद्द करुन निविदाकारांची इसारा रक्कम परत देणेस ही सभा मंजूरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.समीर डबरे सूचक :- मा.श्री. चंद्रकांत गोरीवले**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| ११ | वसई विरार शहर महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागास मिनी वॉटर टेंडर अग्निशमन वाहन फॅब्रिकेशन करुन वाहन पुरवठा करणेकामी प्राप्त ई निविदांमधील कमी व योग्य दराच्या | **ठराव :-** अग्निशमन विभागाकरीता टाटा कंपनीचे मॉडेल ९०९ चॅसीस ४ नग विना निविदा थेट टाटा कंपनीकडून खरेदी करण्यास व प्राप्त निविदांमधील वाहनांवरील फॅब्रिकेशनचे कमी दराचे ई निविदाकार मे. हायटेक सर्व्हिसेस पुणे यांचेकडून वाटाघाटीचे दराने ४ नग टाटा ९०९ वाहनांवर फॅब्रिकेशनचे काम करण्यास तसेच आवश्यकतेप्रमाणे साहित्य खरेदी कमी दराचे ई-निविदाकाराकडून खरेदी करण्यास व घटक क्र. २/३, २/६, २/१५, २/१६,२/१८, २/१९, २/२१, २/२३, २/२४, २/२५, २/२७, २/३१, २/३४, २/३७, २/४१, २/४५, |

| | | |
|---|---|---|
| | निविदाधारकांसोबत संविदा करणेस मान्यता देणे. | २/४७, २/५१, २/५३ या घटकाचे फेरदर मागविण्यास ही सभा मंजूरी देत असून कमी दराचे ई-निविदाकारांबरोबर संविदा करण्यास ही सभा मंजूरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. पंकज पाटील सूचक :- मा.श्री. राजेंद्र कांबळी**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| १२ | वसई विरार शहर महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागासाठी वेळोवेळी आवश्यकतेप्रमाणे उपकरणे व साहित्य पुरवठा करणेकामी सन २०१५-१६ प्राप्त निविदांमधील सर्वात कमी दराच्या निविदाकारांबरोबर संविदा करणेस मान्यता देणेबाबत. | **ठराव :-** सदर प्रस्तावावर सभागृहात चर्चा करणेंत आली. सदर दर हे सन २०१६-१६ या वित्तीय वर्षातील असून प्रस्ताव संविदा करण्याच्या मान्यतेसाठी सन २०१६-१७ च्या अंतिम माहातील स्थायी समिती समोर प्राप्त झाला आहे, सभागृहाचे मत लक्षात घेता सदरचा प्रस्ताव तहकुब ठेवावा व नव्याने प्रशासकीय व वित्तीय मंजूरी घ्यावी अशी सभा ठरवित आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. प्रशांत राऊत सूचक :- मा.श्री. पंकज ठाकूर**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| १३ | वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती C फुटपाथ / डिव्हायडर्स दुरुस्ती व रंगकाम करणे | **ठराव :-** उपरोक्त निविदांची तुलना करता मे. एच.आर.एंटरप्रायजेस ह्यांची निविदा अंदाजपत्रकापेक्षा (+) १.००% जास्त दराची सर्वात कमी व वाजवी आहे. त्याचप्रमाणे निविदेस मा.आयुक्त ह्यांनी मंजूरी दिली आहे. याकामी म.न.पा.तर्फे कायदेशीर बाबींची पुर्तता करून संविदा करणेसाठी ही सभा मान्यता देत आहे व याकामी येणाऱ्या खर्चास अंतिम प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. सुदेश चौधरी सूचक :- मा.श्री. किशोर पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| १४ | प्रभाग समिती (आय) कार्यालय क्षेत्रातील वॉर्ड क्र. ८५ मधील बेणापट्टी धुरी बंगलो मधील रस्ते खडीकरण व डांबरीकरण करणे व आर.सी.सी. पाईप गटार बांधणे याकामी प्राप्त निविदापैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करुन संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत. | **ठराव :-** उपरोक्त निविदांची तुलना करता मे. साई गणेश एंटरप्रायजेस (प्रो.श्री. दिनेश घरतच) ह्यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.५०% जास्त दराची निविदा सर्वात कमी व वाजवी आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये ह्या कमी दराच्या निविदेस मा.आयुक्त ह्यांनी मंजूरी दिली आहे. याकामी म.न.पा.तर्फे कायदेशीर बाबींची पुर्तता करून संविदा करणेसाठी ही सभा मान्यता देत आहे व याकामी येणाऱ्या खर्चास अंतिम प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. किशोर पाटील सूचक :- मा.श्री. चंद्रकांत गोरीवले**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |

| | | |
|---|---|---|
| १५ | वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या वार्षिक लेखा परिक्षण अहवालास मंजुरी देणेबाबत. | **ठराव :-** वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालय, तसेच अ, ब, क, ड व ई प्रभाग समिती कार्यालये व त्यांचे अंतर्गत येणारे उपविभागीय कार्यालयांचे सन २०१४-१५ या वित्तीय वर्षातील तसेच नवीन प्रभाग रचनेनुसार प्रभाग समिती सी चंदनसार, प्रभाग समिती एफ पेल्हार-धानिव व प्रभाग समिती जी वालीव या तीन प्रभाग समिती कार्यालये व त्यांचे अंतर्गत येणारे उपविभागीय कार्यालयांचे सन २०१५-१६ या वित्तीय वर्षातील लेखा परिक्षण अहवाल सादर करण्यांत आला असून सदर वार्षिक लेखा परिक्षण अहवला संबंधित विभागास पाठवणेंस मान्यता देण्यांत येत आहे. संबंधित विभागाने लेखापरिक्षण अहवालातील आक्षेपांची/त्रुटींची पुर्तता करुन त्याबाबतचा अनुपालन अहवाल तीन महिन्यांचे मुदतीत लेखा परिक्षण विभागास सादर करणेंत यावा.<br>**अनुमोदक :- मा.श्री.समीर डबरे सूचक :- मा.श्री. राजेंद्र कांबळी**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |